पुढारी

# विद्यापीठात आजपासून पाचदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहात सोमवार (दि. ९) पासून 'ज्युडीशीयल एक्झामिनेशन प्रिपरेशन अँड फंडामेंटल्स् ऑफ कोर्ट प्रॅक्टिस' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्या. टी. व्ही. नलावडे यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.

तरुण भारत

# राज्यात विद्यापीठ स्तरावर 'बहर महोत्सव'

**पुणे :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे विद्यापीठ स्तरावर कला आणि क्रीडाच्या विविध स्पर्धांचा समावेश असलेला 'बहर' हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. त्यात नोव्हेंबरमध्ये क्रीडा स्पर्धा आणि डिसेंबरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

उच्च आणि तंत्रशिक्षण विभागातर्फे या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या नियोजन आणि अंमलबजावणीसाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे. तंत्रशिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये तंत्रशिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक (लेखा), उच्च शिक्षण सहसंचालक आणि अंकित प्रभू हे अशासकीय सदस्य यांचा समावेश आहे. या समितीच्या अंतर्गत विभागीय समित्यांची नियुक्ती करून महाविद्यालयातील कार्यक्रम, खेळांची निवड करण्यात येईल. तर मुख्य समितीकडून महोत्सवाची रूपरेषा, कार्यक्रमनिहाय दिनदर्शिका ठरवली जाईल.

लोकमत



छत्रपती शाहू मिलमध्ये लोकराजा राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्टार्टअप इनोव्हेशन फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट उत्पादनासाठी सादरकर्त्यांना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# 'स्टार्टअप इनोव्हेशन' फेस्टिव्हलमध्ये खाडे, कुंभोजकर, चौगले यांची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : लोकराजा राजर्षी शाहू कृतज्ञता पर्व अंतर्गत छत्रपती शाहू मिलमध्ये झालेल्या 'स्टार्टअप-इनोव्हेशन' फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट उत्पादनाकरिता विश्वजित खाडे, नितीन कुंभोजकर, धवल चौगुले आणि महिलांमध्ये सागरिका पटवर्धन यांच्या इनोव्हेशनची निवड करण्यात आली.

या फेस्टिव्हलचे नियोजन जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठ आणि सिबीक बिझनेस इन्क्युबेटर यांनी केले होते.

या उपक्रमात विश्वजित खाडे ( आरएनटी रोबोटिक्स) यांना प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र, रोख एक लाख रूपये, तर नितीन कुंभोजकर (सकृत हार्वेस्टर) यांना द्वितीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व रोख ७५ हजार आणि धवल चौगुले (नोकरी महामंडळ) यांना तृतीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व ५० हजार रुपये देऊन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, चंद्रशेखर डोली, एम.वाय.पेंडसे, आदी उपस्थित होते.

0 9 MAY 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रसार जगभर व्हावा

## इतिहास संशोधक डॉ. बी . डी . खणे : अप्रकाशित साहित्य प्रकाशित होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे

प्रतिनिधी
कागल

लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांचे आदर्श विचार आणि कार्य आजच्या पिढीसमोर यावे, त्यांचा कार्याचा प्रसार जगभर व्हावा या दृष्टीने छत्रपती शाहू महाराजांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत, राज्यकर्ते, प्रशासनानेही त्यासाठी पुढे यावे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे इतिहास संशोधक डॉक्टर बी. डी. खणे यांनी व्यक्त केले.

ते छत्रपती शाहू साखर कारखान्यामार्फत आयोजित 'छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य, शाहू जनक घराणे आणि त्यांचे कार्य' या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.

व्यासपीठावर शाहू कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती सुहासिनीदेवी घाटगे, प्रवीणसिंह घाटगे, नंदितादेवी घाटगे, शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, नवोदिता घाटगे, वीरेंद्रसिंह घाटगे, श्रेयादेवी घाटगे, यांची प्रमुख उपस्थिती होती.



व्याख्यानात बोलताना
डॉ. बी. डी. खणे.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांचे जीवन संघर्षमय होते. तरीही त्यांनी दूरदृष्टीने, बारकाईने, अभ्यास करून समाजहिताचे निपक्षपातीपणे छोटे-मोठे कायदे केले. ज्यातून आदर्श समाज घडवला म्हणूनच ते लोकराजे झाले. छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यात त्यांचे बंधू बापूसाहेब महाराज यांचे योगदानही मोठे आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची बहुतांशी जबाबदारी बापूसाहेब महाराज उचलत असत. ब्रापूसाहेब महाराज यांचेवर एकदा का कामाची जबाबदारी दिली की ते निर्धास्त राहत. दुर्दैवाने बापूसाहेब महाराज यांचे कार्य दुर्लक्षित राहिले आहे.

ते म्हणाले, भारतात आणि भारताबाहेर शाहू महाराजांचे कार्य जागतिक पातळीवर नेण्याच्या दृष्टीने मी 'छत्रपती शाहू महाराज एक उत्कृष्ट प्रशासक' या नावाचा ग्रंथ इंग्रजीत प्रकाशित केलेला आहे. ज्याला परदेशी वाचकांकडून चांगली मागणी आहे. लवकरच बापूसाहेब महाराज यांच्या जीवनावर पुस्तक लिहिणार आहे.

### आधुनिक श्रीराम - लक्ष्मण

डॉ.खणे म्हणाले, बापूसाहेब महाराजांचे व्यक्तिमत्त्व मजबूत पोलादी पुरुषासारखे होते. या दोघांमध्ये इतके जिव्हाळ्याचे संबंध होते की शाहू महाराजांचे शिक्षक डॉ. फ्रेझर यांनी तर या दोन भावांच्या बद्दल बोलताना आधुनिक श्रीराम-लक्ष्मण अशी उपमा दिली आहे.

शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांचे कार्य कृतीतून आणण्यासाठी आमचे सतत प्रयत्न चालू आहेत. म्हणूनच मागील वर्षी राधानगरी येथील धरणस्थळी छत्रपती शाहू जयंती साजरी केली. शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. आम्हीही मागासवर्गीय, दिन-दलित, उपेक्षित बांधवांसाठी कार्यरत असून त्यांचा वारसा कृतीतून चालवीत आहोत.

यावेळी शाहू कारखान्याचे उपाध्यक्ष अमरसिंह घोरपडे, संचालक वीरकुमार पाटील, सर्व संचालक, कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण, संचालिका सुजाता तोरस्कर, रेखाताई पाटील, नगरसेविका विजया निंबाळकर आदींसह शाहू ग्रुपमधील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविक एस. आर. मगदूम यांनी केले तर रमेश कांबळे यांनी आभार मानले.